**Sakal Marathi -** 15 March 2017







**ठाणे : विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सत्कार करताना डॉ. राजेश मढवी, स्थानिक नगरसेविका प्रतिभा मढवी. दुसऱ्या छायाचित्रात स्पर्धेत सहभागी झालेल्या महिला.**

# मधुरांगणी रंगले बालपणीचे खेळ

## महिला दिन व होलिकोत्सवानिमित्त विशेष कार्यक्रम

ठाणे, ता. १४ : तळ्यात मळ्यातल्या उड्या, चमचा लिंबूसाठी लागलेली शर्यत, बटाटा शर्यतीसाठीची धावाधाव, सोबत संगीत खुर्चीमध्ये खुर्ची मिळवण्यासाठी चाललेली चढाओढ यात महाविद्यालयीन मुलींपासून ते सत्तरीच्या आज्जीबाईंपर्यंत सगळ्याजणी रंगून गेल्या होत्या. हे खेळ खेळताना त्यांनी पुन्हा एकदा बालपण अनुभवले. निमित्त होते ते महिला दिन आणि होलिकोत्सवाचे.

ठाणे गौरव प्रतिष्ठान आणि सकाळ मधुरांगणतर्फे महिलांसाठी बालपणीचे खेळ शनिवारी (ता. ११) नौपाडा येथील लाल मैदानात घेण्यात आले. अलीकडे जुने खेळ लुप्त होत चालले आहेत. अशावेळी महिला दिनाचे औचित्य साधून बालपणीच्या खेळांचा आस्वाद घेण्याची संधी मधुरांगणच्या महिलांना मिळाली. आपल्या लहानपणीचा सुखाचा काळ आठवण्याचा अनुभव महिलांनी घेतला. विविध स्पर्धांच्या प्राथमिक फेऱ्यांनंतर अंतिम फेऱ्यांमध्ये अव्वल येत महिलांनी अनेक बक्षिसे जिंकली. या वेळी 'बटाटा शर्यती'मध्ये तेजल पाटील, कांचन गाडगे, ज्योत्स्ना कर्डक यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाची बक्षिसे मिळवली. 'चमचा लिंबू' स्पर्धेत अभिलाषा रजक, शुभांगी अडसूळ आणि सीमा पवार विजेत्या ठरल्या. 'सुईधागा' स्पर्धेत कल्याणी वाघमारे यांना प्रथम, वर्षा सहस्त्रबुद्धे यांना द्वितीय आणि रोहिणी आहेरकर यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली. 'तळ्यात मळ्यात' या स्पर्धेत अनिता जोशी, कांचन गाडगे आणि नीलिमा गोठाल या विजेत्या ठरल्या.

नगरसेविका प्रतिभा मढवी आणि डॉ. राजेश मढवी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा इरकशेट्टी व सरकारी वकील संगीता फड, येऊर येथे आदिवासींसाठी काम करणाऱ्या अपूर्वा आगवण यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले, मृणाल पेंडसे, सुनेशी जोशी उपस्थित होते. पुष्पा लेले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.